# कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय
# राष्ट्रीय महामार्ग विभाग

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

पीडब्ल्यूडी ग्रीन बिल्डिंग, उंटवाडी रोड, नाशिक - ४२२ ००२
फोन नं. ०२५३-२५७३२७० ईमेल-eenhnashik@gmail.com

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव


**जा.क्र. रामविना/प्रशा-१/ २५७ /२०२३** **दिनांक : १८/०१/२०२३**

प्रति,
उप वनसंरक्षक,
पूर्व विभाग नाशिक

**विषय :** साक्री-सटाणा-चांदवड-कोपरगाव-शिर्डी राष्ट्रीय महामार्ग क्र. ७५२जी चे (सेक्शन सटाणा ते मंगरुळ) कि.मी. ६४/१०० ते १०१/१४० मध्ये रुंदीकरण दुपदरीकरण /चौपदरीकरण उन्नतीकरण करणे जि. नाशिक
**प्रकल्पासाठी Forest (Conservation) Act १९८० अंतर्गत भावबडबारी घाटातील वन क्षेत्राचे वळतीकरण करणेबाबत.**

**संदर्भ**
१. या कार्यालयाचे पत्र जा.क्र. प्रशा/नाशिक/वि.म.राक्र-१/३४०६/२०२२ दि. २३/०५/२०२१ व रामवि/ना/रेशा/४६६३/२०२२ दिनांक ०६/०९/२०२२.
२. उप वनसंरक्षक, पुर्व भाग, नाशिक यांचे पत्र जा.क्र.कक्ष-३/जमीन/सटाणा-मंगरुळ रस्ता ७.९१७/६९४/२०२२-२३ दि. ९/११/२०२२.
३. उपविभागीय अभियंता, राष्ट्रीय महामार्ग उपविभाग,क्र.१, नाशिक यांचे पत्र जा.क्र. रा.म.उपवि/नाशिक/प्रशा/ २१ / २०२३ दि. १८/०१/२०२३

उपरोक्त विषयांकित कामाचे अंतर्गत येणारे वन हद्दीतील रस्त्याचे वनक्षेत्राचे वळतीकरण/अधिग्रहण प्रस्ताव संदर्भिय पत्र क्र. १ अन्वये सादर करण्यात आला होता. सदरच्या प्रस्तावाच्या अनुषंगाने दि.१९/१०/२०२२ रोजी भावबडबारी घाटातील वन हद्दीतील रस्त्याची प्रत्यक्ष पाहणी आपलेसोबत या कार्यालयाच्या अखत्यारीतील उपविभागीय अभियंता, राष्ट्रीय महामार्ग उपविभाग,क्र.१, नाशिक यांचे समवेत करण्यात आली होती. त्यानुषंगाने संदर्भिय पत्र क्र.२ अन्वये त्रुटी बाबत अहवाल सादर करण्याचे कळविण्यात आले होते. प्रस्तुत पाहणी दरम्यान उपस्थित संरेखनाबाबत सटाणा ते मंगरुळ या प्रकल्पाचे तांत्रिक सल्लागार, मे.एल.एन.मालवीया यांचेकडून अहवाल मागविण्यात आला आहे. त्यानुसार त्यांनी त्यांचे इंग्रजी पत्र जा.क्र. ५२८५ दि. १५/१२/२०२२अन्वये Existing सा.क्र. ९२/९५० मधील वळण हे. ७५.०० मीटर Absolute minimum radius प्रमाणे आवश्यक असल्याने त्यात सुधारणा करणे आवश्यक असल्याचे म्हटले आहे. तरी याबाबत वाहनधारकांची सुरक्षितता लक्षात घेता प्रस्तुत वळणाच्या ठिकाणी **तांत्रिक सल्लागाराने सादर केलेल्या व पुढे केंद्रिय रस्ते वाहतुक व महामार्ग मंत्रालयाने मंजुर केलेल्या** प्रस्तावित संरेखन (Alignment) नुसारच काम करण्यात येणार आहे. त्यामुळे मूळ प्रस्ताव कायम राहणार आहे. तसेच प्रस्तुत महामार्ग साक्री-सटाणा-देवळा-मंगरुळ-चांदवड-शिर्डी रस्ता राष्ट्रीय महामार्ग क्र.७५२जी (जुना राज्य मार्ग क्र.७) हा पूर्वापार वहिवाटीचा राज्य मार्ग दर्जाचा रस्ता आहे. रस्त्याबाबतची सद्यस्थिती खालीलप्रमाणे सादर करण्यात येत आहे.

१. साक्री-सटाणा-चांदवड-कोपरगाव-शिर्डी राष्ट्रीय महामार्ग क्र. ७५२जी "भारतीय रस्ते महासभेच्या (Indian Road Congress) चे मुंबई योजना" अन्वये **रस्ते विकास योजना १९६१-१९८१ नुसार राज्य मार्ग क्र. १७ होता. रस्ते विकास योजना १९८१-२००१ व २००१-२१ नुसार या रस्त्याचा राज्य मार्ग क्र.७ झालेला आहे.** भारत सरकारच्या त्यावेळच्या वाहतुक व नौकानयन मंत्रालयाच्या रस्ते विभागाच्या वतीने भारतीय रस्ते महासभेने (IRC) १९८४ मध्ये भारतीय रस्ते विकास योजना १९८१-२००१ म्हणून प्रकाशित केली आहे. म्हणजेच सन १९६१ पासुन २०१७ पर्यत साक्री-सटाणा-चांदवड-कोपरगाव-शिर्डी राष्ट्रीय महामार्ग क्र. ७५२जी हा रस्ता राज्य मार्ग दर्जाचा होता. सन २०१७ मध्ये केंद्रशासनाच्या

अधिसुचनेद्वारे क्र. का.अ. १३ (अ) दि. ३/०१/२०१७ अन्वये साक्री-सटाणा-चांदवड-कोपरगाव-शिर्डी राज्य मार्ग ७ हा रस्ता दर्जोन्नत होऊन राष्ट्रीय महामार्ग क्र. ७५२जी झालेला आहे, व सदर रस्ता महाराष्ट्र, मध्यप्रदेश व गुजरात राज्याला जोडणारा असुन स्वातंत्र्य पुर्व काळापासून शासनाच्या कब्जेवहीवाटीत असुन महामार्गा वर अविरतपणे वाहतूक दळणवळण सुरु आहे.

२. महाराष्ट्र शासनाचे Gazetteers विभागाद्वारे नाशिक जिल्हयासाठीच्या अधिसूचना The executive editor & Secretary, Gazetteers dept. महाराष्ट्र शासन मुंबईने **प्रथम आवृत्ती १८८३ सुधारीत आवृत्ती १९९४** मध्ये प्रसिद्ध करण्यात आली त्यात देखिल साक्री-सटाणा-चांदवड-कोपरगाव-शिर्डी रस्ता महत्वपुर्ण राज्यमार्ग असुन व त्यावर डांबरीकरण झालेबाबतचा उल्लेख करण्यात आलेला आहे. म्हणजेच सदरचा महामार्ग सन १९६१ पासून राज्यमार्ग असून शासनाचे कब्जेवहिवाटीत आहे. सोबत नाशिक जिल्हयाचे Gazettee जोडले आहे.

३. प्रस्तुत साक्री-सटाणा-चांदवड-कोपरगाव-शिर्डी हा रस्ता **१९६१-८१ मध्ये तयार** करण्यात आलेल्या **भारतीय सर्वेक्षण विभागाच्या** प्रसिध्द **टोपोशिट** वर सुध्दा दाखविण्यात आलेला आहे, सदर नकाशावरून असे दिसते की साक्री-सटाणा-चांदवड-कोपरगाव-शिर्डी हा रस्ता **१८७३ पुर्वी म्हणजे १५० वर्षांपुर्वी खडीचा** रस्ता होता. तसेच महाराष्ट्र शासनाचे रस्ते विकास आराखडयानुसार १९६१ पासुन हा रस्ता राज्यमार्ग दर्जाचा आहे, व शासनाचे कब्जेवहिवाटीत आहे. (सोबत टोपोशिट जोडले आहे.)

४. IRC-७३-१९८० नुसार राज्यमार्गाची land width (R.O.W) हि Plain व rolling terrain साठी ओपन एरीया मध्ये रुंदी **३० ते ६० मीटर** आहे व Mountainous व steep terrain (**डोंगराळ क्षेत्रात**) हि रुंदी **२४.०० मीटर** आहे. (पृष्ठे क्र.५ –IRC-७३-१९८०) त्यास अनूसरुन साक्री-सटाणा-चांदवड-कोपरगाव-शिर्डी या रस्त्याची शासकीय हद्द भाबडबारी घाटात कमीत कमी २४ मीटर आहे.प्रस्तुत रस्त्याच्या ROW किंवा Land Width (२४.०० मी) मध्ये रस्त्याच्या संपुर्ण काटछेद [Carriage way-डांबरीकरण रुंदी + दोन्ही बाजुच्या साईडशोल्डर्स + दोन्ही बाजुचे उतार+ दोन्ही बाजुचे गटारी + भविष्यातील रुंदीकरणासाठी आरक्षित जागा] इ. बाबी समाविष्ट असतात.

५. प्रस्तुत महामार्गाचे भूमी अभिलेख कार्यालयामार्फत १९७७ मध्ये तयार करण्यात आलेल्या भवाडे व खेलदरी या गाव नकाशामध्ये देखिल महामार्गाची रुंदी ३०.०० मीटर आढळून आली आहे. व तसेच त्याचे रेकॉर्ड मध्ये देखिल रस्त्याचे समावेश आहे. (सोबत भवाडे गावाचे टिप्पण नकाशा जोडला आहे)

वरील सर्व बाबी लक्षात घेता Forest Conservation Act १९८० अस्तीत्वात येण्यापुर्वी रस्त्याची डांबरीकरणाची रुंदी हे. ७.०० मीटर व वळणावर ९.०० मीटर अशी आहे. व भाबडबारी घाटात वन हद्दीत प्रत्यक्ष जागेवर संरक्षक भिंत ते गटार हद्दीपर्यंत १५.०० मीटर ते २४.०० मीटर अशी सा.बा.विभागाची शासकिय कब्जे वहिवाट दिसत आहे. उपरोक्त सर्व दस्तऐवज व बाबी लक्षात घेता प्रस्तुत वळतीकरणाचे क्षेत्र खालीलप्रमाणे नव्याने सादर करण्यात येत आहे.

| अ.क्र. | रस्ता प्रकार | गाव व तालुका | वन हद्दी | | एकुण अंतर (मी.) | एकूण बाधीत क्षेत्र (हे.) | १९८० पूर्वी कब्जे वहिवटीतील (दस्तऐवजानुसार सा.बा.विभाग मालकी) सरासरी अस्तीत्वातील क्षेत्र | वन भूसंपादनाचे प्रस्तावित निव्वळ क्षेत्र (हे.) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | पासुन | पर्यंत | | | | |
| १. | राष्ट्रीय महामार्ग.क्र. ७५२ जी | भवाडे ता.देवळा | ९०/८१८ | ९२/८०९ | १९९१ | ५.९७३ | २.९८६ | २.९८७ |
| २. | | खेलदरी ता. चांदवड | ९२/८०९ | ९३/३८० | ५७१ | १.७१३ | ०.८५६ | ०.८५७ |
| **एकुण** | | | | | **२५६२** | **७.६८६** | **३.८४२** | **३.८४४** |

प्रस्तुत संदर्भ क्र.२ मध्ये उपस्थित केलेले मूद्देची शेरेपूर्तता अहवाल या पत्रासोबत स्वतंत्रपणे सादर करण्यात येत आहे.

वन हद्दीतील रस्त्याचे वनक्षेत्राचे वळतीकरण/अधिग्रहण प्रस्तावावर प्रधान सचिव (वने),मंत्रालय मुंबई यांचे मार्फत घेण्यात येणाऱ्या बैठकीत विचारणा होत असते.

वरीलप्रमाणे अनुपालन अहवाल सहपत्रासह आपले माहितीस्तव व पुढील कार्यवाहीस्तव सादर करण्यात येत आहे. तसेच आपला निरिक्षण दौरा लवकरात लवकर होणेचे दृष्टीने योग्यती कार्यवाही व्हावी, ही विनंती.

कार्यकारी अभियंता,
राष्ट्रीय महामार्ग विभाग
नाशिक

सहपत्र:- १. सा.बां.विभागाचा रस्ते विकास आराखडा १९६१- ८१, ८१-२००१, २००१-२१.
२. महाराष्ट्र शासनाचे Gazetteers विभागाद्वारे नाशिक जिल्हयासाठीच्या अधिसूचना.
३. भारतीय सर्वेक्षण विभागाचे प्रसिध्द टोपोशिट.
४. IRC- ७३- १९८० चे पृष्ट क्रमांक.५.
५. भूमी अभिलेख विभागाचे भवाडे गावाचे टिप्पण नकाशा.
६. संदर्भीय पत्र क्र.२ चे अनुपालन अहवाल व कागदपत्रे.

**प्रत** :- अधीक्षक अभियंता, राष्ट्रीय महामार्ग मंडळ, पुणे यांना माहितीस्तव सविनय सादर.

**प्रत** :- उपविभागीय अभियंता, राष्ट्रीय महामार्ग उपविभाग,क्र.१,नाशिक यांना माहितीस्तव व पुढील योग्य त्या कार्यवाहीस्तव.

**प्रत** :- मे.एल.एन.मालवीया, इन्फ्रा प्रोजेक्ट्स प्रा.लि.भोपाल (M.P) पिन कोड- ४६२०११ यांना माहितीस्तव व पुढील योग्य त्या कार्यवाहीस्तव. संबंधित विभागाशी संपर्क साधून निरिक्षण दौरा निश्चित करावा.